शालेय पोषण आहार योजनेसाठी
निधी वितरण (सन २०१७-१८)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२०१७/प्र.क्र.१००/एस.डी.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ११ जानेवारी, २०१८

वाचा:-

१) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८/०४/२०१७

२) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.३-३/२०१७-Desk (MDM) दि.२७/०४/२०१७

३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शापोआ-२०१७/प्र.क्र.१००/एस.डी.३, दि. १६/०५/२०१७

४) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०/०६/२०१७

५) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.३-३/२०१७-Desk (MDM) दि.१३/०७/२०१७

६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शापोआ-२०१७/प्र.क्र.१००/एस.डी.३, दि. ३१/०७/२०१७

७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शापोआ-२०१७/प्र.क्र.१२७/एस.डी.३, दि. २६/०९/२०१७

८) केंद्र शासनाचे आदेश क्र. F. No.४-१/२०१२-Desk (MDM) दि.२३/११/२०१७

९) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.३-३/२०१७-Desk (MDM) दि.१३/१२/२०१७

१०) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.३-३/२०१७-Desk (MDM) दि.२९/१२/२०१७

प्रस्तावना :-

शासनाच्या संदर्भाधिन दि.१६/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये केंद्र हिस्स्याचा रु.२०८०६.८९ लक्ष आणि राज्य हिस्स्याचा रु.१२३४५.७९ लक्ष असा एकूण रु.३३१५२.६८ लक्ष निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी वितरीत केला आहे. शासनाच्या संदर्भाधिन दि.३१/०७/२०१७ च्या शासन निर्णयान्वये केंद्र हिस्स्याचा रु.२६२१५.९३ लक्ष आणि राज्य हिस्स्याचा रु.१५४७८.१७ लक्ष असा एकूण रु.४१६९४.१० लक्ष निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी वितरीत केला आहे. शासनाच्या संदर्भाधिन दि.२६/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील एकूण ६४७ गावे दुष्काळग्रस्त/टंचाईसदृश घोषित गावांमधील सुमारे १५३४४० विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना आठवडयातून ३ दिवस अंडी/दूध/पौष्टीक आहार देण्यासाठी रु.९६७ लक्ष निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी वितरीत केला

आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.२३/११/२०१७, दि. १३/१२/२०१७ व दि.२९/१२/२०१७ च्या आदेशान्वये एकूण रु. ३३२८७.८७ लक्ष निधी राज्य शासनास वितरीत केलेला आहे. केंद्र शासनाने वितरीत केलेला केंद्र हिश्याचा निधी व या योजनेसाठी केंद्र : राज्य हिश्याचे प्रमाण विचारात घेता, रु.१९८१३.७२ लक्ष निधी राज्य हिस्सा म्हणून वितरीत होणे आवश्यक आहे. म्हणजेच केंद्र व राज्य हिस्सा मिळून रु.५३१०१.५९ लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शालेय पोषण आहार योजनेसाठी केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा मिळून खालीलप्रमाणे रु. ५३१०१.५९ लक्ष (रुपये पाचशे एकतीस कोटी एक लक्ष एकोणसाठ हजार) निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पित तरतूद	वितरीत करण्यात येत असलेला निधी
१.	मागणी क्रमांक ई-२,२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, (०१) (१५) मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रात शालेय पोषण आहार कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ ३८०६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	रु. १०९५५८.०५ लक्ष	रु. ३२०८७.८७ लक्ष
२.	मागणी क्रमांक ई-२,२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, (०१) (१६) मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रात शालेय पोषण आहार कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा) (२२०२ ३८१५), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)”	रु. ५५५००.०० लक्ष	रु. १९११३.७२ लक्ष
३.	मागणी क्रमांक ई-२,२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, (०३) (०३), मुंबई महानगरपालिकेसाठी शालेय पोषण आहार कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ ३८२४), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	रु. ५०६४.९३ लक्ष	रु. १२००.०० लक्ष
४.	मागणी क्रमांक ई-२,२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, (०३) (०४), मुंबई महानगरपालिकेसाठी शालेय पोषण आहार कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा) (२२०२ ३८३३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	रु. २९८७.३१ लक्ष	रु. ६५०.०० लक्ष

५.	मागणी क्रमांक ई-२,२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, (०३) (०५), इतर महानगरपालिका, नगरपालिका व स्थानिक संस्थेच्या क्षेत्रातील शाळांसाठी शालेय पोषण आहार कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा) (२२०२ ३८४२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	रु. ५० लक्ष	रु. ५० लक्ष
एकूण		**रु. १७३१६०.२९ लक्ष**	**रु. ५३१०१.५९ लक्ष**

२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. १८/०४/२०१७ व दि. ३०/०६/२०१७ च्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच, परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र. १, २, ३, ५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिशिष्टातील मुद्दा क्र. ४ नुसार केंद्र शासनाचा निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौ.संदर्भ क्र. ५०६/अर्थोपाय, दि. २७/१२/२०१७ व अनौ.संदर्भ क्र. ३/अर्थोपाय, दि. ०३/०१/२०१८ अन्वये दिलेले आहेत. सदर निधीचा विनियोग वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ व दि.३०/०६/२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११११६४६५६६०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2018.01.11 17:30:21 +05'30'

(बी.आर.माळी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई

४) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई

६) सर्व मा. संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य

७) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

८) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

९) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१०) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

११) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

१२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½ , मुंबई/नागपूर

१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१५) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)

१६) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई

१७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई

१८) निवड नस्ती - एस.डी. ३.